# पोलीस अधीक्षक कार्यालय, सांगली

सांगली -मिरज रोड, विश्रामबाग, सांगली - ४१६ ४१५

फोन नं.- ०२३३ २६७२३२३ फॅक्स नं. – ०२३३ - २६७२१००

E Mail- sp.sangli@mahapolice.gov.in


क्रमांक-पशा-५/वा.शा.मिरज/ एकेरी मार्ग/ जाहिरनामा/२०२६ / 8393 सांगली दि. 17 /०६/२०२६

## जाहिरनामा-

मी, तुषार दोशी पोलीस अधीक्षक, सांगली महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन १९५१ चे कलम ३३ पोट कलम १ (ब) रहदारी अधिकारान्वये सांगली-मिरज-कुपवाड म.न.पा क्षेत्रातील वाहतुक व्यवस्था सुरळीत राहण्यासाठी सुधारीत वाहतुक नियोजन जहिरनामा प्रसिध्द करण्यात येत आहे. यांची सर्व नागरिकांनी नोंद घ्यावी.

मिरज शहरामध्ये वाहनांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून महात्मा गांधी चौक हा मुख्य रहदारीचा महत्त्वाचा चौक असलेने सदरच्या चौकामध्ये वाहतुक सुरळीत चालावी यासाठी सिग्नल यंत्रणा कार्यान्वित करण्यात आलेली असून वाहतुक सुरळीत चालु रहावी यासाठी रस्त्याचे मध्ये रस्ता दुभाजक बसविण्यात आलेले असून महात्मा गांधी चौकामध्ये सिग्नल यंत्रणा चालु असताना व इतर वेळी वाहतुक चालु असताना खतीबनगरकडे वाहने उलट दिशेने जातात, त्यामुळे कित्येकदा अपघात झालेले असून वाहतुकीची कोंडी होत आहे. त्यामुळे सदर ठिकाणी एकेरी वाहतुक आवश्यक असल्यामुळे व दररोज होणाऱ्या किरकोळ अपघातास आळा बसण्यासाठी तसेच वाहतुक सुरळीत चालु राहण्यास मदत होण्यासाठी खालील प्रमाणे एकेरी वाहतुक मार्ग (वन वे) करणेत येत आहे.

### ० <u>एकेरी वाहतुक मार्ग खालीलप्रमाणे</u> ०

**खतीबनगर ते महात्मा गांधी चौक :-**

खतीबनगर ( महात्मा गांधी चौक पोलीस ठाणे) ते महात्मा गांधी चौकाकडे येताना सर्व वाहनांना महात्मा गांधी चौकामध्ये येता येईल. परंतु महात्मा गांधी चौक ते खतीबनगरकडे ( महात्मा गांधी चौक पोलीस ठाणेकडे ) जाणारा रस्ता एकेरी मार्ग (वन वे) करण्यात येत आहे.

**पर्यायी वाहतुक मार्ग:-**

१. मिरज शहरातील महात्मा गांधी चौकातुन खतीबनगरकडे न जाता मिरज ते सांगली रोड मार्गे क्रोमा टाटा एंटरप्रायजेस शोरुमच्या समोरुन- उजवीकडे - उत्तरेस वळण घेऊन टायटन शोरुम जवळून- डॉ. विक्रमसिंह जाधव यांचे जाधव हॉस्पीटल मार्गे खतीबनगरकडे जाता येईल. - **दुचाकी, तीनचाकी व चार चाकी वाहनांसाठी**

२. महात्मा गांधी चौकातुन मिरज ते सांगली रोड मार्गे- मिरज सिरॅमिक कॉर्नर येथे उजवीकडे- उत्तरेस वळण घेऊन आनंद नर्सिंग होम मार्गे खतीबनगरकडे जाता येईल.-**दुचाकी, तीनचाकी व चार चाकी वाहनांसाठी**

३. महात्मा गांधी चौकातुन मिरज ते सांगली रोड मार्गे- मिरज सिरॅमिक कॉर्नर- रवा मैदा फॅक्टरी कॉर्नर- उत्तरेस वळण घेऊन - रवा मैदान फॅक्टरीमार्गे खतीबनगरकडे जाता येईल.- **अवजड वाहनांसाठी**

सदरचा जाहिरनामा दि.१७/०६/२०२६ ते दि.१६/०७/२०२६ पर्यंत ३० दिवसांकरिता प्रायोगिक तत्त्वावर राबविण्यात येत आहे. याची सर्व नागरिकांनी कृपया नोंद घ्यावी.

तरी नागरिक रहिवाशी, मोटार वाहन चालकांनी व जनतेने नमूद बदल केलेल्या वाहतुक नियोजनास सहकार्य करावे. तसेच आपल्या हरकती, सचना सहाय्यक पोलीस निरीक्षक वाहतुक नियंत्रण शाखा, मिरज अथवा पोलीस अधीक्षक कार्यालय विश्रामबाग सांगली यांच्याकडे स्वरुपात पाठवाव्यात जेणेकरुन प्राप्त झालेल्या सुचनांचे अवलोकन केल्यानंतर वाहतुक नियोजनात योग्य ते बदल करणेत येतील.

( तुषार दोशी )
पोलीस अधीक्षक, सांगली.

d:\cb-5, sangli\Jahirnama\no parking jahirnama- mission hospital, miraj..docx

Scanned with OKEN Scanner